# * मनोगत *

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत एम. फिल. (मराठी) पदवीसाठी लघुप्रबंधाच्या स्वरुपात मांडण्यासाठी **'अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीलेखनातील स्त्री-चित्रण'** हा विषय निवडला. अण्णाभाऊंचे लेखन, त्यांची कादंबरीकार म्हणून असलेली ओळख एम. ए. करत असताना झाली होतीच त्यावेळी त्यांच्या लेखनातील वेगळेपण, त्यांच्या नायिकाप्रधान कादंबऱ्या, त्यांचा जीवनप्रवास यावर लक्ष केंद्रित केल्यानंतर ते इतर लेखकांपेक्षा वेगळे वाटले. या त्यांच्या वेगळेपणामुळेच या लेखकाच्या नायिकाप्रधान कादंबऱ्यात चित्रित झालेल्या स्त्री-चित्रणाविषयीचा अभ्यास आपण करावा अशी इच्छा मनात निर्माण झाली आणि एम. फिल. लघुप्रबंधासाठी प्रस्तुत विषयावर संशोधन करण्यासाठी डॉ. शिवाजी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासाची रुपरेषा तयार केली. आज हा अभ्यास पूर्णत्वाकडे जात असल्यामुळे मनाला अतीव आनंद होत आहे.

हा अभ्यास करत असताना साहाय्यभूत झालेले माझे सर्व गुरुवर्य, अनेक व्यक्ती, ग्रंथालये, सहकारी मित्र-मैत्रिणी, नातेवाईक या सर्वांच्या माझ्यावरील स्नेहाचे कृतज्ञतेने या क्षणी स्मरण होत आहे. हे सर्व माझ्या मागे नसते तर माझ्यासारख्या विद्यार्थिनीकडून हे अभ्यासकार्य पूर्ण होऊ शकले नसते. याची पूर्ण जाणीव आहे. विशेषत: माझे मार्गदर्शक डॉ. शिवाजी पाटील, डॉ. शिवलिंग मेनकुदळे, डॉ. राजकुमार मस्के, माझे आई-वडिल व माझ्या हितचिंतकांच्या सततच्या प्रोत्साहनामुळेच मी हा अभ्यासविषय पूर्ण करु शकले. या सर्वांचेच शतश: आभार.

**कु. विभुते उर्मिला मनोहर**

# * भूमिका *

अण्णा भाऊ साठे स्वत: निरक्षर असूनही त्यांनी अक्षर साहित्याची निर्मिती केली. त्यांनी कथा, कादंबरी, नाटक, शाहिरी, प्रवासवर्णन इ. वाङ्मय प्रकार हाताळून मराठी साहित्याबरोबरच दलित साहित्यप्रवाहालाही संख्यात्मक, गुणात्मक दृष्टीने संपन्न केले. त्यांच्या प्रतिभेतून संपन्न कादंबरीविश्व आविष्कृत झाले. अनुभवातूनच मराठी भाषा शिकलेल्या अण्णाभाऊंनी आपल्या साहित्याने मराठी भाषाही संपन्न केली.

अर्वाचीन मराठी साहित्याच्या इतिहासात अनेक अर्थांनी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे नाव महत्त्वपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांचे साहित्य त्यांच्या तत्त्वज्ञानाचेच मूर्त स्वरुप असल्यामुळे त्यांचे साहित्य, त्या साहित्यातून आलेला समाज व तत्त्वज्ञान वेगवेगळे पाहताच येत नाही इतके ते एकरुप झालेले आढळून येते.

दलित जनसामान्य माणसाची जीवन जगण्यासाठी चाललेली झुंज हे अण्णाभाऊंच्या साहित्याचे मूलतत्त्वच होते आणि त्यामुळेच त्यांच्या कादंबऱ्यातील नायिकाही परिस्थितीशी झुंज देणाऱ्या, धाडसाने प्रत्येक प्रसंगाशी दोन हात करत आपले स्त्रीत्व, पावित्र्य, शील सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करणाऱ्या दिसून येतात.

अण्णाभाऊंच्या नायिका संकटासमोर हतबल न होता अन्यायाविरुद्ध बंड करुन उठणाऱ्या आहेत. या दृष्टीने 'अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील प्रामुख्याने कादंबरीतील स्त्रीचित्रणाचा अभ्यास' विशेष स्वरुपाचा ठरेल. प्रस्तुत ठिकाणी अण्णाभाऊंच्या प्रातिनिधिक कादंबऱ्यातून चित्रित झालेल्या वैविध्यपूर्ण स्वरुपाच्या स्त्री चित्रणांचा अभ्यास एम. फिल. पदवीसाठीच्या लघुप्रबंधाच्या स्वरुपात मांडण्याचा प्रयत्न येथे केला आहे. वैजयंता, आवडी, चंदन या कादंबऱ्यांच्या आधारे या स्त्री चित्रणाचे विवेचन होणार आहे.

इतर लेखकांच्या तुलनेत अण्णाभाऊ थोडेसे दुर्लक्षितच राहिले. त्यांच्या वाङ्मयलेखनावर समीक्षात्मक व संशोधनात्मक अभ्यास १९८० पर्यंत फारसा झालेला नव्हता. त्यानंतर मात्र बाबुराव गुरव (१९८५ - शिवाजी विद्यापीठ), आशा धावडे (१९८९ - नागपूर विद्यापीठ) यांचे अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यावरील प्रबंधलेखन दिसून येते. दत्ता पाटील यांनीही एम. फिल. पदवीसाठी डॉ. विश्वनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अण्णाभाऊंच्या शाहिरी वाङ्मयाचा अभ्यास (२०००, शिवाजी विद्यापीठ) केलेला दिसून येतो. त्याचबरोबर आसाराम गायकवाड, वि. ब. मटेकर, डॉ. एस. एस. भोसले यांची संपादने अण्णाभाऊंच्या साहित्य विचारांच्या दृष्टिने महत्त्वपूर्ण ठरणारी आहेत.

डॉ. एस. एस. भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या प्रबंधलेखनात डॉ. बाबुराव गुरव यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरी लेखनाचे वर्गीकरण करुन विश्लेषणात्मक निष्कर्ष काढले आहेत. परंतु अण्णाभाऊंच्या खास करुन स्त्री-चित्रणात्मक कादंबरी लेखनाचे विशेषत्वाने विवेचन व विश्लेषण केलेले दिसत नाही. याशिवाय इतरत्रही संपादनात एखाद्या लेखाचा अपवाद वगळता स्त्रीचित्रण विषयक परामर्श हा अण्णाभाऊंप्रमाणेच उपेक्षित राहिल्यासारखा वाटतो. त्यामुळे या ठिकाणी अण्णाभाऊंच्या स्त्रीप्रधान काही निवडक कादंबऱ्यांच्या आधारे विश्लेषण करुन अण्णाभाऊंच्या वैचारिक भूमिका लेखनातून ज्या रीतीने प्रकटलेल्या आहेत त्या मांडणे व या विषयाची उपेक्षा कमी करणे हीच या लेखन विषयीची भूमिका आहे.

प्रातिनिधिक स्वरुपात निवडलेल्या, 'वैजयंता', 'आवडी', 'चंदन' या अण्णाभाऊंच्या तीन कादंबऱ्यातील नायिका वेगवेगळ्या कर्तृत्व क्षेत्रातील असल्यामुळेच या कादंबऱ्या मी निवडलेल्या आहेत. यातील 'चंदन' ही एका विधवा स्त्री कामगाराच्या आयुष्यातील संघर्षावर आधारीत आहे. 'वैजयंता' ही कादंबरी तमाशा कलेतील कलावंतांच्या संघर्षावर आधारित आहे तर, 'आवडी' ही कादंबरी उच्च घराण्यातील स्त्रियांच्या उध्वस्त होणाऱ्या भावविश्वावर आधारीत आहे. या निवडक कादंबऱ्यांच्या आधारे त्यातून आलेल्या स्त्री चित्रणाचा विवेचक व विश्लेषक अभ्यास इथे केला आहे.

'अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीलेखनातील स्त्री-चित्रण' या अभ्यास विषयाचे संशोधन करीत असताना 'चंदन', 'वैजयंता', 'आवडी' या तीन कादंबरी लेखनातील स्त्री-चित्रणाचे विशेषत्त्व लक्षात घेऊनच प्रस्तुत लघुप्रबंधाची काही प्रकरणात विभागणी केली आहे. पहिल्या प्रकरणात अण्णा भाऊ साठे यांचे कादंबरी लेखन व साम्यवादी दृष्टिकोनाचा अण्णाभाऊंच्या व्यक्तिमत्त्वावरील व कादंबरी लेखनावरील प्रभाव मांडण्यात आला आहे. दुसऱ्या प्रकरणात 'चंदन' या कादंबरीतील स्त्री चित्रण या विषयीचे विवेचन केले आहे. त्यानंतर येणाऱ्या तिसऱ्या प्रकरणात 'वैजयंता' या कादंबरीतील स्त्री स्वरुपाविषयीचा विचार विस्तृतपणे मांडला आहे तर चौथ्या प्रकरणात 'आवडी' या कादंबरीतील स्त्री विषयीचा अण्णाभाऊंचा दृष्टिकोन याचे विश्लेषण केले आहे. सर्वात शेवटच्या म्हणजेच पाचव्या प्रकरणात अण्णाभाऊंची विचारप्रणाली व त्या अनुषंगाने त्यांच्या स्त्रीप्रधान निवडक कादंबरीतील स्त्री चित्रणांचे विशेष विस्तृतपणे पाहण्याचा प्रयत्न केला आहे. शेवटी, उपसंहारात वरील सर्व प्रकरणांत हाती आलेल्या निष्कर्षांची मांडणी करुन, संदर्भसूची व अण्णा भाऊ साठे यांच्या वाङ्मयसूचीचे परिशिष्ट जोडले आहे.